# प्रसिध्दी पत्रक

**1) श्री.राजाभाऊ विठ्ठल जाधवर, वय 50 वर्ष, वनरक्षक, 2) श्री. भरत दामु जाधवर, वय 34 वर्ष, वनमजुर (रोजंदारी मजुर), दोघे नेमणुक वन परिक्षेत्र कार्यालय, बार्शी, जि.सोलापुर यांनी 2100/- रुपये लाच रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग उस्मानाबाद च्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | **1) श्री.राजाभाऊ विठ्ठल जाधवर, वय 50 वर्ष, वनरक्षक 2) श्री. भरत दामु जाधवर, वय 34 वर्ष, वनमजुर (रोजंदारी मजुर), दोघे नेमणुक वन परिक्षेत्र कार्यालय, बार्शी, जि.सोलापुर** |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.26.12.2019 रोजी कडकनाथवाडी शिवार |
| तपासी अधिकारी | श्री.आ.बी.थोरात, पोलीस उप अधीक्षक |
| लाचेची रक्कम मागणी | 4000/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 2100/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन स्विकारले. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांची वन विभागाच्या राखीव फॉरेस्टमध्ये पकडुन ठेवलेली जनावरे कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करता व कसल्याही दंडाची पावती न देता सोडण्यासाठी. |

यातील तक्रारदार हे शेती व्यवसाय करीत आहेत. तक्रारदार यांच्या 21 जनावरांनी वन क्षेत्रात विना परवाना प्रवेश करुन नुकसान केले म्हणुन लोकसेवक जाधवर यांनी तक्रारदार यांची 21 जनावरे ताब्यात घेतली होती. सदरची जनावरे कोणतीही कायदेशीर कार्यवाही न करता व दंडाची कोणतीही पावती न देता सोडण्यासाठी यातील आलोसे क्रं.1 श्री.जाधवर, वनरक्षक यांनी तक्रारदार यांचेकडे 4000/- रुपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना श्री. जाधवर, वनरक्षक यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि.26.12.2019 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस उप अधीक्षक श्री. रविंद्र थोरात यांचेकडे कडकनाथवाडी येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने श्री.जाधवर, वनरक्षक यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे वरील नमुद कारणासाठी 4000/-रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 2100/- रु लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.26.12.2019 रोजी सापळा आयोजीत केला असता **श्री.राजाभाऊ विठ्ठल जाधवर, वनरक्षक** यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेच्या मागणीप्रमाणे 2100/- रुपये लाच रक्कम अ.क्र.2 **श्री. भरत दामु जाधवर, वनमजुर यांना स्विकारण्यास** सांगितलेने त्यांनी लाच रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे येरमाळा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री.अरविंद चावरीया, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.रविंद्र थोरात, पोलीस उप अधीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक, श्री.अशोक हुलगे, पोलीस निरीक्षक, सपोफौ/सर्जे, पोह/कठारे, पोह/उपगलमुगले,पोना/जाधव, पोशि/बेळे, पवार,शिंदे, मारकड व चालक कांबळे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

**मोबाईल क्रमांक :-**

**1)** मा.श्री.अरविंद चावरीया, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8530255500

**2)** श्री.रविंद्र भा.थोरात, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9823215195,

**3) टोल फ्री क्र. 1064**, दूरध्वनी क्र.- 02472-222879

**E-Mail ID:-**dyspacbosmanabad@mahapolice.gov.in, 2)dysposmanabad@gmail.com

कार्यालय पोलीस उप अधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद

( आर.बी.थोरात )
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद